GOVERNMENT OF MAHARASHTRA
STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI
8th Floor, New Excelsior Building, A.K.Nayak Marg, Fort, Mumbai-400001. (M.S.)
E-mail - maharashtra.cetcell@gmail.com Website - www.mahacet.org Phone - 022-22016157/59/53/34/19/28

State CET Cell/ AGRI_CAP_CIRCULAR_2020_2021/ 287 Date: 05/02/2021

# परिपत्रक

## विषय : कृषी विद्यापीठाअंतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील सतत येणाऱ्या अडचणींबाबत .....

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या प्रवेश फेरीमध्ये वाटप झालेल्या उमेदवारांना संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेणे अडचणी होत आहे. उमेदवारांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून, प्रवेश वाटप यादीनुसार महाविद्यालय स्तरावर प्रवेश देतेवेळी उमेदवाराची वस्तुस्थिती विचारात घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. यास्तव सर्व महाविद्यालये आणि मे. महा. आय. टी. यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. प्रवेश वाटप पत्रावर नमूद केलेल्या माहितीनुसार (प्रवर्ग, अधिभार, गुणवत्ता इत्यादी) उमेदवाराने कागदपत्रे अपलोड केलेली नसल्यास, मात्र प्रवेश देतेवेळी उमेदवाराकडे आवश्यक ती मूळ कागदपत्रे उपलब्ध असल्यास त्यास प्रवेश देण्यात यावा. केवळ कागदपत्रे अपलोड केलेली नाहीत किंवा चुकीच्या ठिकाणी अपलोड केलेली आहेत, या सबबीखाली प्रवेश रद्द करू नयेत. याबाबतची मूळ कागदपते प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या मंजुरीपर्यंत महाविद्यालयांनी जतन करून ठेवावीत. याविषयी महाविद्यालयांनी मे. महा. आय. टी. यांनी संगणकातील माहिती अद्ययावत करावी. तसेच प्रवेश प्रक्रिया समाप्तीनंतर महाविद्यालयानी अशी प्रकरणे स्वतंत्ररित्या मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडे सादर करावीत.

२. तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये नमूद केलेला प्रवर्ग, अधिभार, गुणवत्ताविषयक बाबी इत्यादी संदर्भात उमेदवाराने कोणतीही हरकत घेतलेली नसताना, अंतिम गुणवत्ता यादीमध्ये प्रवर्ग, अधिभार, गुणवत्ताविषयक बाबींसंदर्भात बदल असल्यास आणि त्याविषयी उमेदवांरांकडून हरकत उपस्थित केल्यास त्याबाबतची शहानिशा करून संबंधित छानन्नी अधिकाऱ्याच्या समन्वयाने योग्य त्या सुधारणा मे. महा. आय. टी., मुंबई यांनी कराव्यात. या सुधारणानुसार पुढील प्रवेश वाटप फेरी राबवावी.

**-सही/-**
**(चिंतामणी जोशी)** भा.प्र.से.
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई**

**प्रति,**

1. राज्यातील चारही कृषी विद्यापीठाअंतर्गत सर्व पदवी अभ्यासक्रमांची महाविद्यालये.
2. मे. महा. आय. टी., मुंबई
3. मा. महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषद, पुणे.